# University of Mumbai

**No. Aff./ICC/ (2018-19)/ 22 / of 2018**

परिपत्रक:

विषय:- शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता अतिरिक्त तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्याची मुदतवाढीबाबत.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १०९(८) अन्वये शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता विशिष्ट विद्याशाखांच्या अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्यासाठी प्रस्ताव संलग्नता विभागाचे परिपत्रक क्रमांक Aff./ICC/ (2018-19)/14/ of 2018 दिनांक १४ जून, २०१८ अन्वये दिनांक १० जूलै, २०१८ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत ऑनलाईन **(Online)** व दिनांक ११ जूलै, २०१८ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत सादर केलेल्या प्रस्तावाची **(Hard copy with Annexure)** मागविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता **अतिरिक्त नवीन तुकडयांना जलदगती पध्दतीने मान्यता देण्यासाठी प्रस्ताव स्विकारण्याची मुदत वाढवून** दिनांक १७ जूलै, २०१८ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत ऑनलाईन **(Online)** व प्रस्तावाची **(Hard copy with Annexure)** संलग्नता/ मान्यता विभाग कक्ष क्र. २०७, दुसरा मजला, विद्यापीठ इमारत, फोर्ट, मुंबई परिसर, मुंबई- ४०० ०३२ येथे जमा करण्याची दिनांक १८ जूलै, २०१८ पर्यत सायंकाळी ५.०० वाजेपर्यत [redacted] करण्यात येत आहे. सदर नमुद केलेल्या दिनांक व वेळेनंतर येणारे प्रस्ताव कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयांचे प्राचार्य/ संचालक

मुंबई-४०० ०३२
१० जुलै, २०१८

(डॉ. दिनेश कांबळे)
कुलसचिव (प्र)